## प्रास्ताविक

प्रस्तुत शोधनिबंधात मी `अरुणोदय` या बाबा पदमनजी यांच्या आत्मचरित्राचा अभ्यास सामाजिक आणि वाङ्मयीन संदर्भातून केला आहे. इंग्रजांच्या आगमनामुळे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात प्रबोधनाचे युग अवतरले होते. `शहाणे करुनी सोडावे सकळ जन` या भूमिकेतून अनेकजण हाती लेखणी धरीत होते. जीवनविषयक जुन्या दृष्टिकोनांची पुनर्तपासणी व नव्या दृष्टिकोनांचा स्वीकार इंग्रजांचा आगमनामुळे सुरु झाला होता. यातून नव्याजुन्याचा संघर्षही अपरिहार्य होता. त्यामुळे लिहित असताना परमत खंडनाबरोबरच स्वमत मंडनाचाही हेतू असे. बाबा पदमनजी यांनी स्वमतमंडनाच्या हेतूमधूनच आपल्या आत्मिक विकासाची कहाणी `अरुणोदया` द्वारे सांगितली आहे. तत्कालीन सामाजिक जीवनाशी बाबांची असलेली जवळीक लक्षात घेता या लेखनात तत्कालीन सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब उमटणे अपरिहार्य आहे. 'स्व' आणि `स्वे` तर यांचे संबंध विशद करताना बाबांचा हेतू समाजदर्शनाचा नाही. तरीही त्याचेकडून कळत - नकळत का होईना पण एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक वातावरणाचे दर्शन घडविले गेले आहे. धर्म, समाज आणि संस्कृति यांचे समीक्षण करुन ख्रिस्ती धर्म स्वीकारणाऱ्या बाबांचे याबद्दलचे विवेचन क्वचित्प्रसंगी एकांगी असले तरी या कालखंडाच्या स्वरुपावर ते चांगलाच प्रकाश टाकते.

धर्मांतराची कहाणी सांगण्याच्या प्रेरणेमधून `अरुणोदया` ची निर्मिती झाली असली तरी हे लेखन साहित्यगुणांनी युक्त आहे. शिवाय बाबांच्या अंतर्मुख वृत्तीमुळे त्यांना आत्मविश्लेषणाची देणगी लाभली आहे. त्यामुळे बाबांच्या मनातील भावदर्शन `अरुणोदया` त परिणामकारकपणे घडते. बाबांची उत्कटता व प्रांजळता प्रचाराला ओलांडून जाते आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचा वेगळाच पैलू आपणापुढे ठेवते.

आ

यामुळे मराठी साहित्यात `अरुणोदय` चे स्थान वैशिष्ट्यपूर्ण बनले आहे. म्हणून `अरुणोदय` हे आध्यात्मिक मनोविकासाच्या प्रस्तुतिकरणाच्या भूमिकेतून जन्मले असले तरी त्याचा अभ्यास सामाजिक आणि वाङ्मयीन संदर्भातून होणे युक्त आणि गरजेचेही आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन या भूमिकेवरच आधारलेले आहे.

या अभ्यासात, प्रस्तुत शोधनिबंधाचे मार्गदर्शक, शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रपाठक डॉ. ल.रा. नसिराबादकर यांचेकडून वेळोवेळी ज्या सूचना, सहाय्य व मार्गदर्शन लाभले त्याचा मला गौरवाने उल्लेख करावासा वाटतो. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच या शोधनिबंधाला मूर्तरूप लाभले. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. गो.मा.पवार यांचेही मला वेळोवेळी सहकार्य लाभले.

आमच्या `वारणा महाविद्यालय, वारणानगर` या महाविद्यालयाचे प्राचार्य स.कृ.पांडे यांचे उत्तेजन आणि मराठी विभागाचे प्रमुख डॉ. मुकुंद दातार यांचे सहकार्य व मार्गदर्शन यांचाही मला कृतज्ञतेने उल्लेख करावासा वाटतो.

डॉ.ग.ना.मोरजे, डॉ.के.सी.कऱ्हाडकर, फादर शोल्के, डॉ.अ.रा.तोरो यांचेशी केलेली चर्चा मला उपयुक्त ठरली. तसेच रे.निर्मळ यांचेबरोबर केलेली चर्चा व त्यांच्या संग्रहातील `ज्ञानोदय` चे जुने अंक मला फारच उपयुक्त ठरले.

पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचे ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठाचे बॅ.खर्डेकर ग्रंथालय, वायसिंगर मेमोरियल लायब्ररी, मिरज, तरुण मित्रमंडळ, शिराळा या संस्थेचे ग्रंथालय - या सर्वच ग्रंथालयांकडून मला अतिशय मोलाचे ग्रंथसहाय्य लाभले. या सर्व संस्थांचा मी ऋणी आहे. तसेच श्री. रोकडे यांनी प्रस्तुत शोधनिबंधाच्या टंकमुद्रित प्रती तयार करण्याचे

काम वेळेवर आणि काळजीपूर्वक करून दिले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या सर्वच संस्था आणि व्यक्ती यांचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो.

- प्र. दा. हसबनीस.

---ooo---